**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.17, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, JAN–FEB, 2018, VOL- 5/43*

# दलित पँथर चळवळ – उदय व उद्दिष्टे

**निशा सिताराम मोरे, Ph. D.**

*(सहयोगी प्राध्यापक), श्रीमती सी. के. गोयल महाविद्याल, दापोडी, पुणे- १२*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

दलित पँथर ही डॉ. बाबासाहेबांच्या विचारसरणीवर आधारित आंबेडकरोत्तर एक जहाल व लढाऊ स्वरूपाची चळवळ आहे असे म्हणता येइल. या चळवळीने महाराष्ट्रातील दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांना विरुद्ध समर्थपणे लढा दिला व दलितांचे प्रश्न सोडविण्या बाबत मोलाची कामगिरी केली. सत्तरीच्या दशकात ही चळवळ महाराष्ट्रात भक्कमपणे उभी राहिली व थोड्याच कालवधीत पँथर चळवळीने आपला दरारा निर्माण केला होता. 'शंभर दिवस शेळी होऊन जगण्यापेक्षा वाघ होऊन एकच दिवस जगावे ' हे दलित पँथर चळवळीचे ब्रीदवाक्य होते. दोन देण्याची व दोन घेण्याची जीद्द व धमक पँथरर्स मध्ये होती. दलित पँथर या संघटनेची स्थापना ९ जुलै १९७२ राजा ढाले व नामदेव ढसाळ या दलित तरुणांनी केली. ज.वी पवार, रामदास सरोटे, लतिफ खाटिक , अविनाश महातेकर, प्रल्हाद चेंदवणकर, अर्जून डांगळे, भाई संगारे, अनिल कांबळे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रीतमकुमार शेगांवकर, टी. एम्. कांबळे, या तडफदार कार्यकर्त्यांनी दलित पँथर चळवळीत भरीव कामगिरी केल्यामुळे पुढे पँथर चळवळ जोमाने फोफावण्यास मदत झाली.

**दलित पँथर चळवळ उदयाची कारणे:**

**तत्कालीन सामाजिक व आर्थिक स्थिती:** दलित पँथर चळवळ उदयास येण्यास तत्कालीन सामाजिक व आर्थिक परिस्थिती कारणीभूत ठरली. या काळात दलितांवरील अन्याय अत्याचारात प्रचंड वाढ झाली होती. या काळात विद्रोही, दलित साहित्य निर्माण झाले. खेडे अधिक बकाल बनले. खेड्यांची मागासलेपणाची वृत्ती, १९६५ ची आर्थिक मंदी, १९७२ साल चा भयानक दुष्काळ, दलितांमधील बेकारीची समस्या या सर्व घटनांमुळे महाराष्ट्राची एकूण परिस्थिती हालाखीची बनली होती. एकंदर या सगळ्या परिस्थितीत दलित जास्त भरडल्या गेले.

**दलितांवरील अन्याय अत्याचारात वाढ** : दलित पँथर चळवळीचे संस्थापकघटक राजाढाले यांच्या मते दलितांवर अन्याय अत्याचारात वाढ झाली. देशभर दलितांविरुद्ध हिंसाचार पेटून उठला असता या हिंसाचाराला तोंड देण्यासाठी संकटग्रस्त बांधवांना त्या संकटातून बाहेर काढण्यासाठी दलित पँथर चळवळीची उभारणी करण्यात आली. १९४५ ते १९६० पर्यंत १९४६ ते १९६९ या कालखंडात जातीभेदाभेदा वरून पाच लक्ष दलितांवर सवर्णांनी अन्याय अत्याचार केले व अकाराशे सतरा दलितांना जीवे ठार मारण्यात आले होते. या काळात दलित महिला अधिक असुरक्षित बनल्या. ५४० महिलांवर

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

बलात्कार झाले. या काळात दलितांवर जे अन्याय अत्याचार होत होते त्याचे स्वरुप भयानक, विदारक होते. विषेशत: खेडोपाड्यातील दलित या अत्याचाराने होरपळून निघाले. दलित व्यक्तीला जिवंत जाळणे, संपूर्ण दलित कुटूंबच्या कुटूंब घरात कोंडणे व घराला आगलावून पसार होणे, दलितांच्या वस्त्या – घरे पेटवणे, त्यांना गुराढोराप्रमाणे मारणे, खून करणे, दलितांसाठी असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरीत मानवी विष्ठा टाकून त्या विहिरीचे पाणी पीण्यायोग्य न ठेवणे, विहिरीत इतर प्रकारची घाण – कचरा टाकणे, दलितांच्या जमीनीवरील उभ्या पीकांचे नुकसान करणे, पीक कापून नेणे, गावपातळीवर त्यांच्यावर सामजिक बहिष्कार टाकून कोंडी करणे, दलित महिलांचा विनयभंग करणे, अस्पृश्य म्हणून सतत हिनवणे, धाक दपटशा दाखवून वंशपरंपरागतपणाचे निमित्त समोर करुन अस्पृश्य म्हणून यांच्याकडून जबरदस्तीने कामे करून घेणे. अनुसूचित जातीच्या लोकांना पंचायतीच्या बैठकीत न बसवता दूर बसवणे किंवा वेगळी व्यवस्था करणे, दलित महिलेला नग्न करून तीची गावभर धींड काढणे, दलित महिलांवर बलात्कार करणे, दलित वस्तीवर बहिष्कार टाकणे, रस्त्यावरून दलितांना लग्नाची वरात काढण्यास मज्जाव करणे, दलितांविरुद्ध विशेषत: महार जातीविरुद्ध राग, द्वेष बाळगणे. गोळवलकर यांनी १९६९ मध्ये चातुवर्ण्य चा पुरस्कार केल्यामुळे दलितांवरील अन्याय अत्याचारात भर पडली.

**दलित पुढाऱ्यांची असमर्थता – निष्क्रियता:** या कालावधीतील नेतृत्व निष्क्रीय बनले होते. रिपब्लिकन पक्ष दलित समाजाच्या मूलभूत प्रश्नांवर खंबीर नेतृत्व देऊ शकला नाही. दलितांचे मूलभूत प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने रिपब्लिकन नेत्यांना अपयश आले. युतीचे राजकारण, फाटाफुटीचे राजकारण केल्याने थोडक्यात संधीसाधू राजकारणात गुंतल्या मुळे रिपब्लिकन पक्षाची वाताहत झाली. दलित नेते सांसदिय राजकारणाकडे आकर्षिल्या गेले. परिणामी केवळ निवडणुकांच्या राजकारणात जास्तप्रमाणात रस घऊ लागले. तत्वशून्य तडजोडीमध्ये मग्न झाल्यामुळे काही प्रमाणात सत्तापदे पण काहींना प्राप्त झाली होती.

**दलित साहित्य निर्मिती :** दलित साहित्य चळवळ १९६० नंतर उदयास आली. दलित साहित्य निर्मिती ही पँथर उदयाचे एक कारण म्हणता येईल. दलित सहित्य वाचून दलित तरुण पेटून उठला. दलित साहित्याने साहित्य जगात अस्वस्थता निर्माण केली. या साहित्याने प्रस्थापित साहित्याला छेद देण्याचे काम केले. दलित साहित्यीकांनी मराठी साहित्य विश्वात क्रांतीकारक बदल घडवून आणला. या व्यवस्थेचे यथार्थ चित्रण या साहित्यातून साकार झाले. प्रस्थापित व्यवस्थेने अपार हाल केले असल्याने या व्यवस्थेबाबत चीड, राग व व्यवस्थेविरूद्ध बंडाची भाषा या साहित्यात दिसून आली. दलित साहित्य चळवळीने तत्कालीन सौंदर्यवादाला (Romanticism) तुच्छ मानले. समाजातील माणसाचे, संपूर्ण समाजाचे, समाजाच्या खऱ्या परिस्थितीचे व या परिस्थितीतून उद्भवणाऱ्या संघर्षाचे यथार्थ चित्रण प्रस्थापितांच्या म्हणजेच ‘ सदाशिवपेठी वाड्मयातून ’ दिसत नाही असा दलित साहित्यीकांनी आरोप केला. दलित पँथर चळवळीच्या उदयास दलित साहित्यीकांनी

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

महत्वाची भूमिका बजावली. या साहित्याच्या मुळे दलितांच्या जाणिवा तिव्र बनल्या. या प्रवाहाने आत्मभान जागे करून दलितांमध्ये एकजिनसीपणा निर्माण केला.

**ब्लॅक पँथर चा परिणाम :** ब्लॅक पँथर ही एक अमेरिकन संघटना आहे. एच. पी. न्यूटन, एल्ड्रीज क्लीव्हर इत्यादी काळ्या तरुणांनी १५ ऑक्टोबर १९६६ मध्ये ब्लॅक पँथरची स्थापना केली. या चळावळीत ब्लॅक पँथर्स नी काळ्या रंगावर म्हणजे वर्णावर जास्त भर दिला. ब्लॅक इज ब्युटीफूल, काळ्या संस्कृती, आचार विचार यांना महत्व दिले. या चळवळीने कार्ल मार्क्स ला आपले आदर्श मानले, मार्गदर्शक ठरविले. त्यांनी काळ्या व गोऱ्यांच्या एकीचा धिक्कार केला. २९ मे १९६६ रोजी निग्रो नेते अॅडम् क्लाथटन पॉवेल यांनी हॉवर्ड विद्यापीठात पदवीदान समारंभात भाषण दिले व या भाषणात त्यांनी प्रथमच ‘ ब्लॅक पॉवर ’ या शब्दाचा उल्लेख केला. हा शब्द काहीच दिवसात लोकप्रिय बनला व १५ ऑक्टोबर १९६६ रोजी ब्लॅक पँथर नावाची चळवळ उदयास आली.

अमेरिकेन ब्लॅक पँथर ने प्रेरित होऊन राजा ढाले, नामदेव ढसाळ या दलित तरुणांनी इ. स. १९७३ साली भारतीय दलित पँथर ची स्थापना केली. भारतीय पँथर्सनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिकवणुकीवर विश्वास व्यक्त करून त्यावर चळवळीची पायाभरणी करून दलित या शब्दाला व्यापक संकल्पना पुढे आणली.

**दलित तरुणवर्गात जाणिव जागृती :** दलित युवकांनी शिक्षण घ्यायला सुरुवात केली. त्यातुन या शिकलेल्या तरुणांमध्ये जाणिव जागृती झाली. ही जाणीव जागृती स्थानिक संघर्षास कारणीभूत होती. हिंदू समाजाने लादलेल्या सामाजिक, आर्थिक , सांस्कृतिक बंधनांची दलितांना चीड येऊ लागली. त्यांना स्वत:चे अस्तित्व, अस्मिता निर्माण करण्याची गरज भासू लागली. जागृत झालेल्या दलित तरूणांना नवी संस्कृती उभारायची होती. या तरुणांमध्ये धर्मांतर केल्याने एक नवा उत्साह आला होता. त्याच बरोबरीने पूर्वी असणाऱ्या कनिष्टतेच्या भावनेचा सल नष्ट होऊन समानतेची भावना निर्माण झाली होती.

**पँथर स्थापना** : माणूस म्हणून जगण्यासाठी, हक्क मिळविण्यासाठी संघटनेने ब्लॅक पँथरर्स प्रमाणे खवळलेला चित्ता हे आपल्या संघटनेचे प्रतिक स्वीकारले. दलितांना आता खवळलेल्या चित्त्याचा पावित्रा घेतला हे समाजाला सूचित करण्यासाठी त्यांनी पँथर च्या प्रतिकाचा स्विकार करून पँथर असे चळवळीला नाव दिले. पँथर चळवळीने ‘ विद्रोह’ नामक मुखपत्र नामदेव ढसाळ व ज. वी. पवार यांच्या मदतीने चालविले. त्यात त्यांनी पँथरची भूमिका समर्थपणे मांडली. दलितांवरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडून दलितांप्रति निष्क्रीय झालेल्य शासनाला जागे करून अन्याय अत्याचार कर्त्यांना खबरदार करण्यासाठी व त्यांच्या प्रति निषेध नोंदविण्यासाठी १५ ऑगस्ट १९७२ च्या साधना विशेष अंकात राजा ढाले यांनी ‘ काळा स्वातंत्र्य दिन’ या शिर्षकाचा लेख लिहिला. या लेखामुळे संपूर्ण महाराष्ट्र भर दलित पँथर संघटना प्रसिद्ध झाली. १९७२ ते १९७४ या कालावधीत नाशिक, देवळाली, परळी, कळम, लातूर, नांदेड, बीड, पुणे, बेळगांव , निपाणी,

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सांगली, सातारा, सोलापूर, जळगांव, चाळिसगांव, भूसावळ, बुलढाणा, औरंगाबाद, धुळे, दिग्रस, पुसद, पुलगांव, वर्धा, अकोला, नागपूर, कटोल, कामठी, सावनेर, चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, बल्लारपूर, अहमदाबाद, दिल्ली, छिंदवाडा, भोपाळ आणि हिंगणघाट या ठिकाणी पँथरच्या शाखा उघडल्या. ' मागास जातींसह आर्थिक व सामाजिक दृष्ट्या शोषित असलेल्या सर्वच पददलितांचा उद्धार करणे' हा व्यापक उद्देश चळवळ स्थापने मागील होता.

**दलित पँथर –ध्येय धोरण कार्यक्रम उद्दिष्ट :**

१. सामाजिक क्रांती घडवून आणणे व दलितांचे प्रश्न सोडविणे.

२. आर्थिक शोषण विरुद्ध , सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्ववाद विरुद्ध लढा उभारणे.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नवबौद्ध कष्ठकरी लोक, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटके विमुक्त यांना संघटित करून जातीभेद, धर्मभेदाविरुद्ध लढा उभारणे. जमीनदार, बागायतदार, भांडवलदार यांच्या विरुद्ध लढा उभारून उपेक्षितांना, शोषितांना न्याय देणे. जात, धर्म, वर्ग विरहीत समाजरचना निर्माण करणे हा पँथर चळवळीचा मुख्य उद्देश होता. दलित, आदिवासी, भटके – विमुक्त, शेतमजूर, उपक्षित यांना शोषणापासून मुक्त करून या देशात दलित– श्रमिक वर्गाचे सत्ता निर्माण करणे. देशात समतेची तसेच राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक क्रांती करण्याचे उद्दिष्ट पँथरने बाळगले होते. दलित साहित्यिक शरणकुमार लिंबाळे यांच्या मते दलित पँथरचे लक्ष व्यक्ती नसून व्यवस्था होती. अन्न, वस्त्र, निवारा, नोकरी, जमीन, शिक्षण, अस्पृश्यता व सामाजिक व शारीरिक अन्याय हे प्रश्न आग्रक्रमाने सोडवण्यावर भर दिला. पँथरचा दूरच्या कार्यक्रमामध्ये देशीविदेशी भांडवलदार व त्यांच्याद्वारे होत असलेली मजूरांची पिळवणूक थांबवणे हा होता. उत्पादनाची साधने समाजाच्या मालकीची करून त्यावर दलित – श्रमिकांची सत्ता स्थापन करणे. आर्थिक व सामाजिक शोषणमुक्त समाज तयार करणे या सारख्या कार्यक्रमांचा समावेश पँथर मध्ये होता किंबहूना दलितपँथर संघटना त्यासाठीच स्थापन झाली होती.

दलित – श्रमिक वर्गातील बेकार तरुणांच्या नोकऱ्यांचा प्रश्न सोडविणे, त्यांना बेकारी भत्ता मिळवून देणे, शेतमजूर स्त्री – पुरुषांना किमान वेतन ५ रुपये मिळाले पाहिजे, दलित, कष्टकरी, श्रमिकंना सर्व शिक्षण मोफत मिळाले पाहिजे, दलित वाड्या वस्त्यांमधील पिण्याच्या पाण्यचा प्रश्न विहिरी खोदून व सार्वजनिक विहिरींवर दलितांना पाणी भरता येईल असे प्रयत्न करून सोडविणे हे कार्यक्रम दलित पँथर संघटनेने प्राधान्य क्रमावर ठेवले होते.

दलित पँथर या संघटनेने दलित युवकांना संघटित करून प्रतिगामी शक्तींच्या विरोधी लढा उभारला. दलितांना योग्य तो न्याय मिळवून देण्याच एक प्रामाणिक प्रयत्न केला. दुर्देवाने विचारसरणी व व्यक्तीवादामुळे पँथरमध्ये फुट पडली. पँथरच्या वैचारिक भूमिकेत उणिवा होत्या. या उणिवांमुळे पँथर चळवळ अपेक्षेप्रमाणे सर्व जातीतील दलितांना वर्गाच्या पातळीवर संघटित करू शकली नाही. राज्यशास्त्राचे अभ्यासक गोपाळगुरू याच्या मते ' पँथर ने दलितांचे आर्थिक प्रश्न

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सोडविण्या ऐवजी सांस्कृतिक प्रश्न हाताळले. शेतमजूरांचा किमान वेतनाचा प्रश्न, भूमिहीनांना जमिन वाटपाचा प्रश्न, गायरान जमीन वाटपाचा प्रश्न हे महत्वाचे प्रश्न होते पण ते न सोडवता केवळ सांस्कृतिक प्रश्न सोडविण्याकडे पँथरचा कल होता. दलित पँथर चळवळ समाजातील सर्व दलितांना वर्गाच्या पातळीवर संघटित करू शकली नाही; परिणामी शासक वर्गाविरूद्ध ठोस संघर्ष उभारू शकली नाही', काळाच्या ओघात पँथर प्रतिनिधी विविध पक्षात सामिल झाले. या सर्व गदारोळात दलितांचे प्रश्न मात्र 'जैसेथे' राहिले.

**संदर्भ सूची**

*खरात शंकरराव, १९८८, तराळ अंतराळ, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे.*
*चव्हाण प्रविण, ( भाषांतर ), २००३, मराठवाड्यातील दलितांवर अत्याचार महाराष्ट्रातील जातीकलह सत्यशोधन समितीचा अहवाल, सुगावा प्रकाशन, पुणे.*
*ढाले राजा, २००२, दलित पँथरची संस्थापना: वस्तुस्थिती आणि विपर्यास, फुले आंबेडकर विचार /प्रसार केंद्र, पुणे.*
*लिंबाळे शरणकुमार, १९८९, दलित पँथर, (संपा), सुगावा प्रकाशन, पुणे.*
*पानतावणे गंगाधर (संपा), गायकवाड दिपक, १९९५, अस्मितादर्श, वार्षिक विशेषांक, औरंगाबाद.*
*मुरुगकर लता, १९९५, दलित पँथर चळवळ, सुगावा प्रकाशन, पुणे,*
*राठी शुभांगी दिनेश, २०१४, महाराष्ट्रातील सामाजिक – राजकीय चळवळी व प्रशासन, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे.*
*saamana.com/dalit -sahitya, पी.डी विठ्ठल, २३जाने २०१८, दलित साहित्यातील विद्रोह,*
*मनोहर साप्ताहिक, १७ फेब्रुवारी १९७४, पान नं ५, चौकट स्तंभ ३ व ४*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*